
# पदविका प्रवेश

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

# दहावीनंतर अभियांत्रिकी तंत्रशिक्षणाचे पर्याय




# दहावीनंतर पदविका अभ्यासक्रमाचे फायदे

खाजगी किंवा सरकारी क्षेत्रात कनिष्ठ अभियंता/निरीक्षक म्हणून नोकरी मिळू शकते किंवा आपण स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकता.

पदविका आणि पदवी दोन्ही पात्रता असलेल्या उमेदवारांसाठी सरकारी किंवा खासगी क्षेत्रातील कंपन्यांची भरती प्रक्रियेमध्ये जास्त संधी उपलब्ध होतात.

राज्यातील तंत्रनिकेतनांचे मॉनिटरिंग, अभ्यासक्रम, परीक्षा यावर महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळामार्फत देखरेख केली जाते. त्यामुळे राज्यात सर्वत्र पदविका अभ्यासक्रमाचा दर्जा उत्तम व एकसमान राखला जातो.




पदविका अभ्यासक्रमात, पदवी अभ्यासक्रमांचा बराचसा अभ्यास झालेला असतो, त्यामुळे अभियांत्रिकी पदवी करणे सोपे जाते.

अभियांत्रिकी पदवी घ्यायची असल्यास थेट द्वितीय वर्ष पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेऊ शकता.

१२ वी पीसीएम मध्ये जर ४५/५० टक्के पेक्षा कमी गुण मिळाले तर असे विद्यार्थी प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवीसाठी प्रवेशास पात्र नाहीत.

बारावीनंतर अभियांत्रिकी पदवी प्रवेशासाठी राष्ट्रीय / राज्यस्तरीय प्रवेश परीक्षा (सीईटी / जेईई) द्यावी लागते. मात्र पदविका प्रवेशासाठी व पदविकेनंतर पदवी प्रवेशासाठी कोणत्याही प्रवेश परीक्षेची गरज नाही.

३ वर्षे पदविका व ३ वर्षे पदवी असे ६ वर्षात तुम्हाला पदविका तसेच पदवी देखील मिळेल.

# पदविका अभ्यासक्रम व त्यांची पात्रता

## पदविका अभियांत्रिकी

| | प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम | थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम |
|---|---|---|
| पात्रता | ३५ % गुणांसह दहावी परीक्षा उत्तीर्ण | १०+२ विज्ञान/टेक्निकल/ व्होकेशनल उत्तीर्ण किंवा १०+२ वर्षांचा ITI/CoE उत्तीर्ण |
| अभ्यासक्रम | स्थापत्य, यंत्र, विद्युत,संगणक, अणुविद्युत, माहिती तंत्रज्ञान, रसायन, खनिकर्म, वस्त्रनिर्माण, उत्पादन, ड्रेस डिझाइन, प्रिंटिंग, उपकरणीकरण इत्यादी | |

## पदविका Pharmacy, HMCT, SCT

**प्रथम वर्ष बारावीनंतरचे पदविका अभ्यासक्रम**

पात्रता

A. **फार्मसी**: भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र या अनिवार्य विषयासह गणित किंवा जीवशास्त्र यापैकी एक विषय घेऊन बारावी उत्तीर्ण

B. **HMCT**: ३५ % गुणांसह बारावी परीक्षा उत्तीर्ण

C. **सरफेस कोटिंग टेक्नोलॉजी** : इंग्रजी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित विषय घेऊन बारावी उत्तीर्ण

# पदविका प्रवेश प्रक्रिया

महाराष्ट्रातील पदविका प्रवेशासाठी शासनामार्फत एकच प्रवेशप्रक्रिया राबविली जाते. हि प्रक्रिया ऑनलाईन प्रकारची असुन यामुळे आपणांस प्रत्येक पॉलीटेक्निकसाठी वेगळा फॉर्म भरण्याची आवश्यकता नाही.

## प्रवेश प्रक्रियेचे मुख्य टप्पे

1. ऑनलाईन अर्ज भरून सुविधाकेंद्रांवर अर्ज कन्फर्म करणे
2. ऑनलाईन ऑप्शन फॉर्म (कॉलेज व अभ्यासक्रम व पसंतीक्रम) भरणे
3. कोणते कॉलेज व अभ्यासक्रम मिळाले ते ऑनलाईन पाहणे
4. प्रवेश निश्चिती केंद्रावर जाऊन प्रवेश निश्चित करणे
5. मिळालेल्या कॉलेज मध्ये जाऊन प्रवेश निश्चित करणे

टीप: प्रवेश प्रक्रियेसंबंधी पात्रता, नियम व संपूर्ण माहिती www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रवेशप्रक्रियांच्या वेळी प्रसिद्ध केले जातात.

# पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी महत्वाची आवश्यक कागदपत्रे

| |
|---|
| दहावीची **गुणपत्रिका**<br>(प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी) |
| इयत्ता दहावी व बारावीची **गुणपत्रिका**<br>(प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र, HMCT व सरफेस कोटिंग टेक्नोलॉजी अभ्यासक्रमासाठी) |
| इयत्ता दहावी व बारावी विज्ञान/टेकनिकल/ व्होकेशनल /आयटीआयची **गुणपत्रिका**<br>(थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी) |
| शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला **(लिविंग सर्टिफिकेट)** |
| **जात/ जमात प्रमाणपत्र** (मागासवर्गीय उमेदवारांसाठी, आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी आवश्यक ) |
| **नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र** (SC व ST व्यतिरिक्त मागासवर्गीय उमेदवारांसाठी, आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी आवश्यक ) |
| **दिव्यांग/सैन्यदल/अल्पसंख्यांक प्रमाणपत्र** (संबंधित आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी आवश्यक) |

टीप: प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रांची सविस्तर माहिती, प्रवेश प्रक्रियांच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या माहितीपुस्तिकेमध्ये देण्यात येते.

# पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी असलेले विविध आरक्षण

| अ. क्र. | आरक्षणाचा प्रकार | आरक्षणाची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती /अनुसूचित जाती बौद्ध धर्मामध्ये रूपांतरित (SC ) | १३.० |
| २ | अनुसूचित जमाती (ST) | ७.० |
| ३ | विमुक्त जाती (VJ)/ निरधिसूचित जमाती (DT) (NT-A) | ३.० |
| ४ | भटक्या जमाती-ब ( NT-B) | २.५ |
| ५ | भटक्या जमाती-क ( NT-C) | ३.५ |
| ६ | भटक्या जमाती-ड ( NT-D) | २.० |
| ७ | इतर मागास वर्ग (OBC) | १९.० |
| ८ | सामाजिक, शैक्षणिक मागास प्रवर्ग (SEBC) | १२.० |

| | |
|---|---|
| दिव्यांग उमेदवारांसाठी आरक्षण (PWD) | ५% |
| अनाथ उमेदवारांसाठी आरक्षण (Orphan) | १% |
| संरक्षण सेवा कर्मचाऱ्यांच्या मुला / मुलींसाठी आरक्षण (Defence) | ५% |
| महिला उमेदवारांसाठी आरक्षण (Female) | ३०% |
| आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील उमेदवारांसाठी आरक्षण (EWS) | १०% |

# पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था व उपलब्ध जागा

| पदविका अभ्यासक्रम | शासकीय | | अशासकीय अनुदानित | | विनाअनुदानित | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था | प्रवेश क्षमता | संस्था | प्रवेश क्षमता | संस्था | प्रवेश क्षमता | संस्था | प्रवेश क्षमता |
| प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी | ४२ | १७७५९ | १६ | ३८९० | ३२० | ८६३९२ | ३७८ | १०८०४१ |
| थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी | ४२ | ७१०५ | १७ | १३८२ | ३२८ | ७३७८८ | ३८७ | ८२२७५ |
| औषधनिर्माणशास्त्र | ४ | २१० | १९ | ११५० | ३७१ | २२९०१ | ३९४ | २४२६१ |
| हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नोलॉजी | २ | १२० | ० | ० | १ | ६० | ३ | १८० |
| सरफेस कोटिंग टेक्नोलॉजी | ० | ० | १ | ४० | ० | ० | १ | ४० |

टीप: वरील तक्त्यामधील माहिती शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता उपलब्ध झालेल्या जागांची आहे.

# संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजना





## महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे मान्यताप्राप्त निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी  शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती (EBC)

- केंद्रीय प्रवेश प्रक्रिये (CAP) द्वारे पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी या व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिक मागासवर्गीयांना आर्थिक सहाय्य करणे हे या योजनेचे उद्दीष्ट आहे.
- आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी ज्यांच्या पालकांचे एकूण वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लक्ष वा त्यापेक्षा कमी आहे.
- यामध्ये पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या ५०%  व परीक्षा शुल्काच्या ५०% शिष्यवृत्ती मिळते.




या योजनेचे ऑन लाईन अर्ज शासनाच्या आपले सरकार महाडीबीटी पोर्टल (AAPLE SARKAR MAHADBT PORTAL) वर भरले जातात.
(Website:- https://mahadbtmahait.gov.in)





# डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

**महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे मान्यताप्राप्त निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांत शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेल्या राज्यातील पात्र विद्यार्थ्यांना वसतिगृह निर्वाह भत्ता खालील प्रमाणे अनुज्ञेय आहे.**

| अ क्र | प्रकार | प्रवेशित अभ्यासक्रमाच्या संस्थेचे ठिकाण | वार्षिक वसतीगृह निर्वाह भत्त्याची एकुण रक्कम (शैक्षणिक वर्षातील १० महिन्याकरिता) | राज्याच्या प्रत्येक जिल्हयासाठीचा संच (Quota) |
|---|---|---|---|---|
| 1 | ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत. | (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) | रु. ३०,०००/- | सर्व पात्र विद्यार्थी |
| | | राज्यातील अन्य ठिकाणी | रु. २०,०००/- | |
| 2 | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी (कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा - १ लाख पर्यंत) | (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) | रु. १०,०००/- | सर्व पात्र विद्यार्थी |
| | | राज्यातील अन्य ठिकाणी | रु. ८,०००/- | |
| 3 | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी (कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा - १ लाखापुढे ते ८ लाख पर्यंत) | (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) | रु. १०,०००/- | ५०० पर्यंत मर्यादित संच |
| | | राज्यातील अन्य ठिकाणी | रु. ८,०००/- | |

या योजनेचे ऑन लाईन अर्ज शासनाच्या आपले सरकार महाडीबीटी पोर्टल (AAPLE SARKAR MAHADBT PORTAL) वर भरले जातात.
(Website:- https://mahadbtmahait.gov.in)




**महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागाकडून राज्यातील तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रम (पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी) मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शिख, पारशी, जैन व ज्यू या अल्पसंख्यांक समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल व गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना.**

शिष्यवृत्तीची रक्कम :- संबधित शैक्षणिक अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे प्रत्यक्ष वार्षिक शैक्षणिक शुल्क किंवा रू. २५,०००/- या पैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम

या योजनेचे ऑन लाईन अर्ज शासनाच्या आपले सरकार महाडीबीटी पोर्टल (AAPLE SARKAR MAHADBT PORTAL) वर भरले जातात.
(Website:- https://mahadbtmahait.gov.in)

# धन्यवाद